साप्ताहिक

भारत सरकार मान्यताप्राप्त

# अनंत विचार

संपादक : सचिन हरी आदापुरे मो.नं.९८५००२७६४३

WEEKLY
ANANT VICHAR
वेब पोर्टल | युट्युब न्यूज नेटवर्क
Editor : SACHIN HARI ADAPURE
CELL NO - 9850027643
nageshadapure1978@gmail.com

अनंत विचार चा अंक WHATSAPP वर वाचण्यासाठी आपला WHATSAPP नंबर व नांव वरील नंबरवर SMS करावा

वर्ष : दुसरे | वार:मंगळवार | दि.१९ मार्च २०२४ | किंमत : ५ रुपये | पाने : ४ | अंक: ३३ | R.N.I.No.-MAH-MAR-2022/83591 | PPR/83/2023-2025

# राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या अर्थसहायात भरीव वाढ

## आता मिळणार महिन्याला वीस हजार रुपये, वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी निर्णय - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई दिनांक १५: राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीत अकरा हजारावरून वीस हजार रुपये अशी भरीव वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भात अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी केलेल्या म ागणीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला. वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

यासंदर्भात गेल्या वर्षीच्या अधिवेशनात विधानपरिषदेत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी देखील यासंदर्भात चर्चा उपस्थित केली होती त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात अर्थसहाय वाढविण्याची घोषणा केली होती.

ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि वृध्दावस्थेत त्यांची हेळसांड होऊ नये म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेत अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना सध्या ११ हजार रुपये सन्मान निधी दर महिन्याला मिळतो. आता नऊ हजार रुपयांनी ही रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने राज्यातील वयोवृद्ध पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयामार्फत ही योजना राबविण्यात येत असून निकष व कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्ष पात्र अधिस्वीकृतीधारक ज्येष्ठ पत्रकारांनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल. ही मासिक अर्थसहाय्याची रक्कम शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधील ५० कोटी इतक्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेतूनच देण्यात येईल. ही रक्कम डीबीटीने संबंधित पत्रकारांच्या खात्यात जमा होईल. गेल्या वर्षी मार्चमध्येच हा निधी ३५ कोटींवरून वाढवून ५० कोटी करण्यात आला आहे.

राज्यात अनेक वयोवृद्ध पत्रकार हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत. त्यांना वैद्यकीय उपचारासाठी देखील आर्थिक मदत नसते. या वाढीव निधीमुळे त्यांना चांगले अर्थसहाय मिळेल.



# विठ्ठल रुक्मिणी मूर्तीच्या संरक्षणासाठी बुलेट प्रुफ काचेचे आवरण


पंढरपूर - येथील श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे व जिर्णोद्धाराचे काम पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. त्यामध्ये श्रीं.विठ्ठल रूक्मिणीमातेच्या गाभा-याचे संवर्धन आषाढी यात्रा २०२४ पूर्वी करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, गाभा-यातील संवर्धनाचे काम करताना मुर्तीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक असल्याने विठ्ठल रुक्मिणी दर्शन वेळेत बदल करण्यात आला आहे.याबाबत १२ मार्च रोजी बैठक घेऊन निर्णय घेण्यात आला होता. आज पासून विठ्ठल रुक्मिणीच्या गाभाऱ्यातील ग्रॅनाईट फरशी काढण्याचे काम सुरू असल्याने मूर्तीला इजा होऊ नये म्हणून मूर्तीच्या संरक्षणासाठी बुलेट प्रुफ काच बसवण्यात आली आहे.

विठ्ठल मंदिरातील सर्व चांदीकाम काढण्यासाठी २५ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या पर्यवेक्षणाखाली सर्व चांदी काढण्यात आली असून, मूर्तीच्या संरक्षणार्थ बुलेटप्रूफ काचेचे आवरण बसविण्यात आले आहे. आता, १८ मार्च पासून गर्भगृहातील ग्रॅनाईट काढण्याच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात येत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

मंदीराचे मुळ रुप कायम ठेवून जतन व संवर्धनाचे काम करण्यात येत असून, मंदीरात लावण्यात आलेल्या चांदीचे कामही नव्याने करण्यात येणार असून, मंदिरातील सर्व चांदी काढून दुरूस्ती करून पून्हा बसविण्यात येणार आहे. पुर्वीची चांदी काढून ती वितळवून आवश्यकतेनुसार भर टाकण्यात येणार आहे. या कामासाठी समिती नेमणूक करण्यात येणार आहे. तसेच या सर्व कामाचे संपूर्ण व्हिडीओ चित्रिकरण करण्यात येणार आहे. गर्भगृहातील कामासाठी १५ मार्च पासून पदस्पर्श दर्शन बंद करण्यात आले आहे. भाविकांसाठी सकाळी ११वाजेपर्यंत मुख दर्शन खुले ठेवण्यात आले आहे. पुढील दीड महिना विठ्ठल रुक्मिणीचे पदस्पर्श दर्शन हे बंद राहणार आहे.

# सोलापूर जिल्ह्यात उन्हाचा तडाखा वाढला

सोलापूर - सोलापूर शहर व तालुक्यात उन्हाळ्यातील उन्हाचे चटके भासू लागल्याने रस्ते निर्मनुष्य तर बाजारपेठ, शासकीय कार्यालय आदी सार्वजनिक ठिकाणी वर्दळ कमी झाली असून सर्वत्र शुकशुकाट दिसून येत आहे. मार्च महिन्यात उन्हाची तीव्रता जास्त जाणू लागल्याने एप्रिल, मे महिन्यात काय अवस्था राहील याचा विचार नागरिक आताच करू लागले आहेत. त्यामध्ये लोकसभेच्या निवडणुका असल्याने उन्हाचा पारा जसा वाढेल, तसा यावर्षी प्रचाराचा पारा ही वाढण्याची शक्यता आहे. शिवारातील विहिरी, नद्या, नाले कोरडे ठणठणीत असून हातपंप उचक्या देऊ लागले आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची व जनावराच्या पाण्याची समस्या तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उजनी धरणाने तळ गाठल्याने सोलापूर शहर व तालुक्यातील ८१ गावाची शिरभावी योजनेस पुरेसे पाणी मिळेल का याबाबत शंका आहे. सांगोला शहरात सध्या एक दिवसाआड पाणी ते फक्त ३० ते ४५ मिनिटं मिळत आहे. पूर्वी जाहीर केलेल्या वेळेप्रमाणे पाणी मिळत होते, परंतु आता पाण्यासाठी नळाकडे डोळे लावून वाट बघण्याची वेळ आली आहे.




# महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अधिवेशन व पुरस्कार सोहळा संपन्न




साप्ताहिक अनंत विचार न्यूज

पिंपरी चिंचवड पुणे येथे शीनवार दिनांक १६/३/२४ रोजी राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळा संपन्न झाला या सोहळ्याच्या निमित्त पंढरपूरचे पश्चिम महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी संघाचे संघटक संजय भोकरे अध्यक्ष वसंत मुंडे महासचिव विश्वासराव आरोटे तसेच ज्येष्ठ संपादक, ज्येष्ठ विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, सर्वपक्षीय नेते, संघाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बांधव बहुसंख्येने या सोहळ्यास उपस्थित होते.

# पंढरपूरमध्ये आज काँग्रेसची सभा

पंढरपूर- जिल्हा काँग्रेस कमिटी व इंडिया आघाडीच्यावतीने आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर मंगळवार दि.१९ रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, आमदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये येथील संत तनपुरे महाराज मठात सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

दुपारी दोन वाजता आयोजित सदर सभेमध्ये शोध पत्रकार निरंजन टकले हे मार्गदर्शन देखील करणार आहेत. सोलापूर शहर, जिल्हा काँग्रेस कमिटी व इंडिया आघाडीच्या वतीने माजी आमदार प्रकाश यलगुलवार तसेच इंडिया आघाडीचे सर्व ज्येष्ठ नेतेमंडळी यांच्या प्रमुख उपस्थितीत हाती हात धरू, संकल्प विजयाचा करू या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तर मंगळवारीच सकाळी दहा वाजता मोहोळ येथील घाटुळे मंगल कार्यालयात देखील सदर सभा संपन्न होणार आहे.

या सभेस उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश पाटील, सुनेत्रा पवार, युवक जिल्हाध्यक्ष सुनंजय पवार, पंढरपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर सुर्यवंशी यांनी केले आहे.

# संपादकीय

## धोरण तर आले!

१३ मार्च २०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये नुकतेच राज्य शासनाने 'मराठी भाषाधोरण' जाहीर करून सुखद धक्का दिला. २०१० साली शासनाने स्थापन केलेल्या भाषा सल्लागार समितीने पुढील २५ वर्षांसाठी भाषाधोरणाचा मसुदा बनवून तो शासनाला सादर केला. नंतर विविध ठिकाणी या मसुद्यावर चर्चा झाली. २०२१ साली पुनर्रचित भाषा सल्लागार समिती अस्तित्वात आली. या समितीने काही शिफारशी तशाच ठेवून, काहींची भर घालून पुन्हा नव्याने शासनाला धोरणाचा मसुदा सादर केला. या लेखात शालेय शिक्षणासंबंधित मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले आहे. हे धोरण असे म्हणते की, महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचे माध्यम प्रामुख्याने मराठी असेल. याचा अर्थ मराठी माध्यमातील शिक्षणाची जबाबदारी घेण्यास शासन कटिबद्ध आहे. एकदा जबाबदारी घेतली की प्रश्नांची सोडवणूक करणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. मराठीतील शिक्षण अधिक दर्जेदार व्हावे म्हणून प्रयत्न करणे, शिक्षक प्रशिक्षणाचा नियोजनबद्ध कार्यक्रम राबवणे, पटसंख्येअभावी अडचणीत असणाऱ्या शाळांना बल देणे, शिक्षणसेवक योजना रद्द करून शिक्षकांना त्यांच्या हक्काचा सन्मान देणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीचा मार्ग मोकळा करून देणे, अंगणवाड्या सेविकांसाठी उचित वेतनाची तरतूद करणे अशी ठाम पावले शासनाकडून अपेक्षित आहेत. त्याकरिता शासनाने घेतलेल्या निर्णयांचाच शासनाला फेरविचार करावा लागणार आहे. उदाहरणार्थ : – सरकारी शाळा खासगी व कॉर्पोरेट क्षेत्राला दत्तक देण्याचा निर्णय रद्द करणे, समूह शाळा योजना रद्द करणे. कमी पटाच्या शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा, खिलाडू वृत्ती व सांघिक भावना विकसित होऊ शकत नाही, हे कारण देऊन शासनाने कमी पटाच्या शाळांच्या एकत्रीकरणातून समूह शाळा निर्माण करण्याची मोहीम हाती घेतली आहे व याचा सर्वात मोठा फटका मराठी शाळांना बसणार आहे. काही दिवसांपूर्वी विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये गाजलेली 'एकूण पट १' ही एकांकिका पाहायचा योग आला. त्या शाळेत असलेली एकच विद्यार्थिनी तिच्या मराठी शाळेचे चैतन्य जिवंत ठेवते. मुलींच्या शिक्षणासाठी गावात नजीकच्या परिसरातच शाळा असणे गरजेचे आहे. शहरी भागांत खासगी संस्था पैशाच्या जोरावर मराठी शाळांचे भूखंड घशात घालतील, अशी भिती घेऊन मराठी शाळा तग धरून आहेत. मराठीच्या जतन संवर्धनासाठी मराठीतील शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तोच तर मराठीचा श्वास आहे. धोरण तर आले, आता प्रश्न मुद्द्यांच्या काटेकोर अंमलबजावणीचा आहे. कारण, धोरण लकवा हा इत:पर मराठीला परवडणार नाही. शिक्षणसेवक योजना रद्द करून शिक्षकांना त्यांच्या हक्काचा सन्मान देणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीचा मार्ग मोकळा करून देणे, अंगणवाड्या सेविकांसाठी उचित वेतनाची तरतूद करणे अशी ठाम पावले शासनाकडून अपेक्षित आहेत. त्याकरिता शासनाने घेतलेल्या निर्णयांचाच शासनाला फेरविचार करावा लागणार आहे. उदाहरणार्थ : – सरकारी शाळा खासगी व कॉर्पोरेट क्षेत्राला दत्तक देण्याचा निर्णय रद्द करणे, समूह शाळा योजना रद्द करणे. कमी पटाच्या शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा, खिलाडू वृत्ती व सांघिक भावना विकसित होऊ शकत नाही, हे कारण देऊन शासनाने कमी पटाच्या शाळांच्या एकत्रीकरणातून समूह शाळा निर्माण करण्याची मोहीम हाती घेतली आहे व याचा सर्वात मोठा फटका मराठी शाळांना बसणार आहे. काही दिवसांपूर्वी विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये गाजलेली 'एकूण पट १' ही एकांकिका पाहायचा योग आला. त्या शाळेत असलेली एकच विद्यार्थिनी तिच्या मराठी शाळेचे चैतन्य जिवंत ठेवते. मुलींच्या शिक्षणासाठी गावात नजीकच्या परिसरातच शाळा असणे गरजेचे आहे. शहरी भागांत खासगी संस्था पैशाच्या जोरावर मराठी शाळांचे भूखंड घशात घालतील, अशी भिती घेऊन मराठी शाळा तग धरून आहेत. मराठीच्या जतन संवर्धनासाठी मराठीतील शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तोच तर मराठीचा श्वास आहे. धोरण तर आले, आता प्रश्न मुद्द्यांच्या काटेकोर अंमलबजावणीचा आहे. कारण, धोरण लकवा हा इत:पर मराठीला परवडणार नाही.नुकतेच राज्य शासनाने 'मराठी भाषाधोरण' जाहीर करून सुखद धक्का दिला. २०१० साली शासनाने स्थापन केलेल्या भाषा सल्लागार समितीने पुढील २५ वर्षांसाठी भाषाधोरणाचा मसुदा बनवून तो शासनाला सादर केला. नंतर विविध ठिकाणी या मसुद्यावर चर्चा झाली. २०२१ साली पुनर्रचित भाषा सल्लागार समिती अस्तित्वात आली. या समितीने काही शिफारशी तशाच ठेवून, काहींची भर घालून पुन्हा नव्याने शासनाला धोरणाचा मसुदा सादर केला.

## अरूणकाकांचा ९६ तासांचा दिवस



शीर्षक वाचून कोड्यात पडला असाल ,पण खरे तेच लिहितोय.मार्गशीर्ष महिना दत्तजयंतीचा महिना दत्तभक्तांसाठी जणू पर्वणीच!.हा महिना आला की आनंदाश्रम संस्थापक परमपूज्य सदगुरूसेवक अरूणकाकांची आठवण येते. जीव कासावीस होतो,डोळे अश्रूंनी भरून जातात. आठवू लागते काकांची दिव्य तपश्चर्या.२००३ सालापासून मी अरूणकाकांच्या संपर्कात आलो.आमचे नातलग व व्यवसायबंधू रमेश घळसासी मला मोहोळ तालुक्यातील यावली, दत्तमंदिर येथे घेऊन गेले.पुढच्याच वर्षी मी सेवेकरी होऊन अरूणकाकांच्या सान्निध्यात आलो. १५ दिवसांच्या गुरूचरित्र पारायण सेवा व अध्यात्मिक शिबीरात सामील झालो.२००५ साली माझ्या वडीलांनी सलग ३ गुरूचरित्र पारायणाचे २१ दिवसांचे अनुष्ठान केले म्हणून त्या वर्षी यावलीला गुरूचरित्र पारायण सोहळ्यास गेलो नाही.पण त्यानंतर २०१५ सालापर्यंत न चुकता प्रत्येक शिबीरात मी सहभागी होत होतो.दत्तजयंतीच्या तीन दिवस आधी सेवकराम गुरूजी यांच्या मार्गदर्शनामध्ये दत्तयाग सुरू व्हायचा.आनंदाश्रममधून मिळणारा रक्षक धागा अभिमंत्रित करण्यासाठी या यागामध्ये पीठ स्थापना व्हायची आणि सुरू व्हायचा अरूणकाकांचा उपवास.उपवास म्हणजे देवाच्या सान्निध्यात राहणे व पंचेद्रियांना काहीही न देणे. तहान लागली आणि कोणी पाणी मनाने आणून दिले तर पिणे अन्यथा तसेच बसणे.अरूणकाका सदगुरूंचे नामस्मरण करीत कधी मंदिरात तर कधी मंदिराशेजारी बसलेले असायचे.या ९६ तासांत अरूणकाका झोप घेत नसत. टक्क जागे राहून फक्त जास्तीतजास्त नामस्मरण कसे होईल याचाच ध्यास ते घेत असत.म्हणून मी ९६ तासांचा दिवस म्हणालो.आज आनंदाश्रम श्रीक्षेत्र आनंदवाडी, पोस्ट यावली, तालुका मोहोळ ,जि.सोलापूर येथे मोठ्या प्रमाणात बांधकाम पूर्ण झाले आहे.पण आधी हा परिसर पूर्ण मोकळा होता.मार्गशीर्ष महिन्यात येथे शरीर गोठवणारी थंडी पडत असे.तेथील दत्तमंदिराजवळील फरशी एखाद्या बर्फाच्या लादी प्रमाणे गार पडायची काका अशा फरशीवर बसून आपली कठोर साधना करायचे. काका म्हणायचे हा देह सदगुरूंनी दिला आहे याचे काय करायचे तो ठरवेल. अरूणकाकांच्या परिमार्जनामुळे अनेकांना प्रचिती आल्याने माझ्यासारखे अनेक भक्त या कालावधीत आनंदाश्रमात मुक्कामी राहत. दत्तजयंतीच्या आदले दिवशी तर आनंदाश्रमात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असे,त्यामुळे उबदार पांघरूणांचा तुटवडा पडे.एखाद्या भक्ताला पांघरूण नसेल तर काका आपल्या अंगावरील शाल द्यायचे आणि तसेच थंडीचा सामना करत आपली तपश्चर्या करीत रहायचे.या कालावधीत सविताकाकू त्यांची अत्यंत काळजी घेत पण त्यांच्यावर आनंदाश्रमात येणाऱ्या भाविकांच्या महाप्रसादाची जबाबदारी असायची.काकांबरोबर काकूंचीही ही जणू कठोर तपश्चर्याच या कालावधीत असायची.कधी कधी आनंदाश्रमात झोपण्यास जागा नसायची अरूणकाकांचे सेवेकरी अरूणकाकांच्या आसपास रात्रभर बसून असायचे आणि मग सुरू व्हायचा सत्संग.अरूणकाकांच्या मुखातून दिव्य मार्गदर्शन मिळत असे.या सत्संगातच चमत्कार घडायचे काका हवेत हात वर करायचे टक् म्हणून आवाज यायचा आणि पेढा हातात यायचा तर कधी रुद्राक्ष तर कधी सुपारी तर कधी रूद्राक्षाची माळ.काका म्हणायचे, चमत्कारा शिवाय नमस्कार नाही.मला तुम्ही नमस्कार करावा म्हणून मी असे चमत्कार करत नाही. तुम्ही नमस्कार करताच मी सदगुरार्पणमस्तु असे म्हणून तो सदगुरूंकडे पाठवून देतो.तुमचा नमस्कार ठेवून घ्यायचा मला अधिकार नाही.तुमच्यातील सात्विक गुण वाढावा तुमचे नामस्मरण वाढले पाहिजे तुमचे क्रियामाण कर्म सुधारले पाहिजे यासाठी हे चमत्कार माझ्याकडून सदगुरू दत्तात्रेय करून घेतात. तुम्ही सेवेकरी झाले पाहिजे तुमच्या आचरणातून कळले पाहिजे हा अरूणकाकांचा सेवेकरी आहे. पुढे अरूणकाका म्हणायचे, मी सदगुरूंवरती एकच आरोप करतो ' करतो हो तुम काम सबका सदगुरू और नाम मेरा करतो हो ' मी वायर आहे खरा करंट सदगुरू दत्तात्रेय आहेत.मी निमित्तमात्र आहे मला तुमच्यातील देवत्व म्हणजेच सदगुरूंना जागे करायचे आहे,तुमच्यातील सदगुरुंची सेवा करायची म्हणून मी स्वतःला सदगुरूसेवक म्हणून घेतो.

प्रत्यक्ष अष्टसिध्दी पायाशी लोळण घेत असतानाही परमपूज्य अरूणकाका पराकोटीचे नम्र होते.मला त्यांचा खूप सहवास लाभला, सोनेरी दिवसच होते जणू ते.सज्ञनगड निवासी समर्थ रामदास यांनी अध्यात्मिक लोकांचे वर्गीकरण चार विभागात केले होते.एक बध्द ,दुसरा मुमूक्षू , तिसरा साधक, चौथा सिद्ध.

बध्द :– केवळ कामवासनेने पछाडलेला आपल्या स्वार्थाने बरबटलेला

मुमूक्षू :– जीवनात बऱ्यापैकी स्थिरस्थावर झाल्यावर थोडी सेवाही करावी असा विचार करणारा साधक :– केवळ सेवेचाच विचार करणारा, सतत नामस्मरण करणारा अहंकार विरहित सिध्द : – सर्व इंद्रियांवर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी झालेला अष्टसिध्दी प्राप्त झालेला उदा.चांगदेव

हे सर्व सांगण्याचा उद्देश अरूणकाका स्वतःला साधकच म्हणायचे त्यांनी कधीही स्वतःला सिद्ध म्हटले नाही प्रपंचात राहून परमार्थ करता येतो याचे सर्वोच्च उदाहरण म्हणजे अरूणकाका!!काकांनी २९ जून २०१६ रोजी देह ठेवला. तेंव्हापासून आजपर्यंत एकही क्षण त्यांच्या आठवणीशिवाय जात नाही.त्यांनी ५१ हजार कोटी रामनामाचा संकल्प केला आहे.माझ्या या लेखाच्या माध्यमातून सर्वांना हीच कळकळीची विनंती आहे आपल्या दैनंदिन कामात असताना नामस्मरण करा. अरूणकाका नामस्मरण करण्यासाठी ९६ तासांचा दिवस करायचे आपण काही तास आपला प्रापंचिक व्याप सांभाळून करण्यास काय हरकत आहे?शक्य झाले तर गुरूचरित्र पारायण मार्गशीर्ष महिन्यात जरूर करा .ही सुध्दा एक प्रकारची नामस्मरण सेवाच आहे.अरूणकाका हा विषय माझे एकप्रकारचे व्यसन आहे त्यावर मी कितीही लिहू शकतो.पण काही मर्यादा पाळलेल्या बऱ्या म्हणून या लेखाची सांगता करतो.

फक्त अरूणकाकांचाच क्रांतीनंद

## जसा विश्वास, तसा परिणाम

### सरश्री



जसा तुमचा विश्वास, तसा तुम्हाला लाभणारा परिणाम!

समजा, जग खूप सुंदर आहे यावर तुम्ही दृढविश्वास ठेवलात, तर तुम्हाला या जगातील सर्व सुंदर, मंगल गोष्टींचंच दर्शन घडेल. मग तुमच्या संपर्कात येणारे लोक, तुमच्याशी निश्चितच मैत्रीपूर्व संबंध ठेवतील.

विश्वास बाळगलात तर कदाचित काही लोक इतरांशी वाईट वागतीलही, पण तुमच्याशी मात्र ती चांगलंच वागतील. यामागील एकमेव कारण म्हणजे, तुमचा दृढविश्वास! या विश्वासामुळेच तुम्ही लोकांच्या अंतर्यामी असणारा चांगुलपणा प्रकट होण्यासाठी निमित्त बनता.

पण नाण्याला दोन बाजू असतात, त्याप्रमाणेच कोणत्याही घटनेला दोन बाजू असतात. त्यामुळे समोरच्या व्यक्तीची वर्तणूक वाईट असेल, तर याचाच अर्थ, तुम्हीदेखील त्याला तसं वागण्यासाठी कळत–नकळत प्रोत्साहन देत असता, हे लक्षात घ्यायला हवं. आता हीच बाब एका उदाहरणातून समजून घेऊया.

आपल्या घरातील बल्ब पेटण्यासाठी विजेचं सर्किट पूर्ण व्हावं लागतं, हे सर्वांनाच ठाऊक आहे. बल्ब पेटला याचा अर्थ, सर्किट पूर्ण झालं. आता हीच बाब तुमच्या दैनंदिन जीवनातील घटनांसोबत जोडून पाहा. समजा, तुमच्या जीवनात जेव्हा समस्या, अडचणी सुरू असतात, तेव्हा जणू लाल रंगाचा बल्ब पेटलेला असतो. लाल रंग म्हणजे दुःखाचं प्रतीक मानूया. पण जेव्हा तुम्ही प्रसन्नतेचा, आनंदाचा अनुभव घेता, तेव्हा हिरव्या रंगाचा बल्ब पेटलेला असतो. येथे हिरवा रंग म्हणजे समृद्धीचं, प्रसन्नतेचं प्रतीक होय. आता तुमच्या जीवनात लाल रंगाचा बल्ब पेटणार की हिरव्या रंगाचा, हे सर्वस्वी तुमच्या मनात असणाऱ्या विश्वासावरच अवलंबून आहे. कारण विश्वासाच्या माध्यमातून तुम्ही एक सर्किट पूर्ण करत

तेजज्ञान फाउंडेशन
9921008060
helpdesk@tejgyan.org

हे पत्र मुद्रक सोमनाथ नवनाथ शिंदे यांनी प्रकाशक सचिन हरी आदापुरे व मालक सचिन हरी आदापुरे यांचे करीता दर्लिंग ग्राफिक्स, जुना बस स्टँड शेजारी, दर्शन उद्योग भवन, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे छापून घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर येथून प्रकाशित केले. संपादक : सचिन हरी आदापुरे, घर नं.१२२५, नाथ चौक, पंढरपूर, जि.सोलापूर मो.नं.९८५००२७६४३ (या अंकात प्रसिध्द झालेल्या मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्ष–पंढरपूर)

printed by SOMNATH NAVNATH SHINDE and published by SACHIN HARI ADAPURE and on behalf of SACHIN HARI ADAPURE printed at DARLING GRAPHICS, near old bus stand, darshan udyog bhavan , pandharpur, Dist - Solapur and published by Nath chouk pandharpur Editor : Sachin Hari Adapure, House No 1225, Nath chouk, Pandharpur Mob.9850027643

# लग्नाळू मुलांची गंभीर समस्या

लग्न म्हणजे ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावरील आत्युच आनंदाचा क्षण. तेथून आयुष्याला वेगळे वळण मिळते. जगण्याचे प्रयोजन मिळते. धडपडीला वेग येतो. उमेद वाढते. एकमेकां च्या सुखा साठी झटायच, मुलांच्या भविष्याच नियोजन करायच, एक ना दोन सारी धडपड संसारा साठी!

पण लग्नचं होत नसेल तर? जगण्याचे प्रयोजन संपते. अनेक कारणामुळे कोमल कळ्या कुस्करल्या गेल्या. अन मुलींची संख्या भराभर कमी झाली. व त्यामुळे मुलीच्या आई बाबा चा भाव वधारला. येणाऱ्या प्रत्येक स्थळा ला नकार देणे हा त्यांचा आवडता छंद बनला. आणि अपेक्षा ही वाढल्या. मुलगा सरकारी नोकरदार हवा, बिझनेस असेल तर मोठे शो रूम असावे. घर नव्हे तर बंगला च हवा. चार चाकी गाडी हवी. त्यातून ही सर्वाधिक मार्केट पुणे शहराला आहे. पुणे सेंटर प्लेस आहे, मोठे औद्योगिकक्षेत्र आहे. तिथे मुलीला ही जॉब मिळू शकतो हे खरे असले तरी सर्वांना पुण्यात जॉब मिळेल का? मिळाला तरी लगेच स्वतःचा फ्लॅट घेणे शक्य होते का? एक ना दोन अनेक समस्या ना या लग्नाळू मुलांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी आपल्या गावी छोटा मोठा व्यवसाय करणे किंवा मिळेल तो जॉब करणे याशिवाय पर्याय नसतो. परंतु संसार व्यवस्थित करण्याची धमक व कर्तृत्व त्यांच्या मध्ये नक्कीच असते. मग त्यांना नकार दयायचा कशा साठी? मुलगा एकुलता एक हवा असे म्हणताना आपल्या ला ही मुलगा आहे हे विसरून चालत नाही. आपण दुसऱ्या मुला कडून ज्या अपेक्षा करतो त्या सर्वांची पूर्तता आपण करू शकतो का? आपल्या मुलीला सासू सासरे नको असतील तर सुनेला ही नको असतील मग आपण कुठे जायचे? हा प्रश्न महत्वाचा आहे. सर्व गुण सम्पन्न कुणी च असू शकत नाही, कुठे तरी अड्जस्टमेंट करावी लागते. अशा वेळी आपली मुलगी सुख समाधानी संसार करू शकेल अशा स्थळा ला होकार देऊन दोघा चे हित बघावे हिच विनंती.

जनक राजा ने रामा सारख्या राजकुमारा ला दिलेली सीता चौदा वर्ष वनवासा त होती. राजमहालात उर्मिला लक्ष्मना शिवाय सुखी होती का? मग आपण सर्व सामान्य माणसे धडपडत, पडत, उठत सुखी राहण्याचा प्रयत्न करतो हे काय कमी आहे का? असा विचार केला तर लग्नाळू मुलांच्या गम्भीर समस्या नक्कीच कमी होतील. व त्यांचा संसार वेळेत होऊ शकेल. अन्यथा कदाचित आपली ही मुले त्याच रांगेत असण्याची शक्यता नाकारतायेत नाही.

**शोभा भारत माळवे. पंढरपूर**

# अकलूजमध्ये विविध पक्षांच्या नेत्यांची अचानक बैठक



सोलापूर - आज आमची कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही. विजयदादांनी आम्हाला जेवायला बोलावलं होते. असे म्हणत विधानपरिषदेचे माजी सभापती राम राजे निंबाळकर यांनी शिवरत्न बंगल्यावर पत्रकारांशी बोलणं टाळले असले तरी एकाच वेळी विविध पक्षांमधील नेते मंडळी शिवरत्न बंगल्यावर एकवटल्याने चर्चेला उधाण आले होते.

रविवारी सकाळी रामराजे नाईक निंबाळकर, शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई आ.जयंत पाटील, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर, रघुनाथराजे निंबाळकर, फलटणचे आमदार दीपक चव्हाण, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, करमाळ्याचे माजी आम दार नारायण आबा पाटील, सांगोला तालुक्यातील डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ.अनिकेत देशमुख, माजी आमदार जयवंत जगताप, संजय कोकाटे व माण खटाव तसेच सोलापूर जिल्ह्यातील प्रमुख नेते उपस्थित होते.

या सर्व नेत्यांची बंद दारा आड किमान दीड तास गुप्त खलबते झाली. धैर्यशील मोहिते पाटील हे माढा लोकसभा निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने नाराज होते. मात्र भाजपाचे मंत्री गिरीष महाजन यांनी सोलापूरमध्ये केलेल्या वक्तव्याने ही नाराजी दूर झाल्याची चर्चा होती व यामुळे बंड होण्याआधीच थंड झाले अशा वावड्या उठल्या होत्या. मात्र रविवारी शेतकरी कामगार पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यासह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील नेते येथे एकत्र आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. शेकापचे जयंत पाटील यांनी ही राजकीय चर्चा न झाल्याचे सांगत विजयदादांनी बोलावल्यामुळे आपण येथे आल्याचे सांगितले. मात्र त्यांनी अकलूज ही राजकीय क्षेत्रात कलाटण्या देणारी भूमी असल्याचे स्पष्ट केले. तर संजय कोकाटेंनी आपली परखड भूमिका मांडत मोहिते पाटलांनी आता धाडसी निर्णय घेण्याची वेळ आली आहे. हा निर्णय जर घेतला नाही तर आपणा सर्वांची राजकीय अवस्था बिकट होईल, असे स्पष्ट केले.

लवकरच मंत्री गिरीष महाजनही शिवरत्नवर बंगल्यावर भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळत आहे. ज्यांच्यासाठी हा सर्व राजकीय सारीपाटाचा खेळ मांडला जातोय त्या धैर्यशील मोहिते पाटील यांनी वेट अँड वॉच म्हणत शांत राहणे पसंत केले. यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहीते पाटील, मदनसिंह मोहिते पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजकीय पक्षांनी आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे

## सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांची सूचना



पंढरपूर - लोकसभा निवडणूक चांगल्या वातावरणात आणि नियमावलीत पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहितेचे सर्वच राजकीय पक्षांनी काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रांताधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४ च्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची व निवडणूक नियुक्त अधिकाऱ्यांची बैठक प्रांत कार्यालयात घेण्यात आली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, मदन जाधव, गटविकास अधिकारी किरण मोरे, नायब तहसीलदार जयश्री स्वामी उपस्थित होते.

यावेळी प्रांताधिकारी इथापे म्हणाले, भारत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. या कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे. वाहन, झेंडे व फलकाचा वापर करताना आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या उम दवारांनी प्रचाराचे साहित्य जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समि तीकडून पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. मंदिर, मशीद किंवा इतर कोणत्याही प्रार्थनास्थळाचा निवडणूक प्रचारासाठी वापर करू नये. निवडणूक प्रचार कार्यालय व संपर्क कार्यालय येथे लावण्यात येणारे फलक परवनगी घेवूनच लावावेत.

तसेच ग्रामपंचायतस्तरावर उभारण्यात आलेल्या स्वागत कमानीवर राजकीय पक्षाचे नाव अथवा चिन्ह असेल तर ते झाकून घ्यावीत. पंढरपूर, मंगळवेढा शहर तसेच ग्रामस्तरावरील फलक तत्काळ काढावेत. निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे तसेच कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी ४ भरारी पथके व ४ स्थिर सर्वे क्षण पथकांची नेमणूक करण्यात आली आहे, असेही प्रांताधिकारी इथापे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.भोसले म्हणाले, लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभमीवर निवडणूक संदर्भात विविध परवनगीसाठी प्रांत कार्यालय सांस्कृतिक भवन, पंढरपूर येथे एक खिडकी कक्ष सुरु करण्यात आला असून, त्या ठिकाणाहून आवश्यक परवानग्या घ्याव्यात. परवानाधारकांनी शस्त्रे संबधित पोलीस स्टेशन येथे जमा करावीत. निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे उल्लघंन होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्र खो-खो संघात वाडीकुरोलीच्या तिघींचा समावेश



पंढरपूर - भारतीय खेल प्राधिकरण, भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्यावतीने दि.२० व २१ मार्च रोजी पश्चिम विभागीय खेलो इंडिया खो-खो लीग १४ व १८ वर्षाखालील किशोरी व मुली गटातील स्पर्धेचे आयोजन मुंबईतील लालबाग येथे केले आहे. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील वाडीकुरोलीच्या तीन विद्यार्थीनींची राज्याच्या संघात निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी राज्य खो-खो असोसिएशनचे सचिव अ‍ॅड. गोविंद शर्मा यांनी महाराष्ट्राचे दोन्ही संघ जाहीर केले. यात किशोरी संघाच्या प्रशिक्षकपदी वाडीकुरोलीच्या कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबच्या अतुल जाधव यांची निवड झाली आहे. तसेच सोलापूर जिल्हा संघातील वाडीकुरोलीच्याच कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबच्या कल्याणी लामकाने (किशोरी गट), स्नेहा लामकाने व साक्षी देठे (कुमारी गट) यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. त्यांचे सोलापूर अ‍ॅम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले. किशोरी संघाच्या कर्णधारपदी सांगलीच्या वैष्णवी चाफेची तर मुली गटाच्या कर्णधारपदी धाराशिवच्या सुहानी धोत्रेची निवड झाली आहे. निवड झालेल्या खेळाडूंचे १९ मार्च रोजी लालबाग, मुंबई येथे राष्ट्रीय स्पर्धापूर्व सराव शिबिर होईल.

# नागरिकांसाठी मतदार मदत कक्ष स्थापन

## ०२१८६-२९९०९९ या क्रमांकावर मिळणार सुविधा

पंढरपूर - नागरिकांना निवडणूविषयक माहिती आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी ४२ सोलापूर (अ.जा.) लोकसभा मतदार संघातर्गंत २५२ पंढरपूर विधानसभा मतदार संघामध्ये सांस्कृतिक भवन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पंढरपूर येथे मतदार मदत कक्ष सुरु करण्यात आला आहे. सदर मतदार मदत कक्षाचा दुरध्वनी क्रमांक ०२१८६-२९९०९९ असून हा मदत कक्ष चोवीस तास सुरु राहणार असल्याची माहिती प्रांताधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

सदर मतदार मदत कक्षातील हेल्पलाईन क्रमांकावर मतदार यादीतील नाव शोधणे, मतदार



यादीतील अनुक्रमांक आदीबाबत आवश्यक असलेली माहिती तात्काळ देण्यात येणार असून, नागरिकांनी या उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रांताधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी इथापे यांनी केले आहे.

# चळेतून मराठा समाज पाच अर्ज भरणार

पंढरपूर - मराठा समाजाचे आंदोलक नेते मनोज जरांगे-पाटील व सकल मराठा समाजाच्या सूचनेनुसार मराठा समाजाच्या मागण्या पूर्णत्वास गेल्या नाहीत. यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत शासनाचे लक्ष वेधण्यासाठीच चळे (ता.पंढरपूर) येथून पाच जण अर्ज भरण्याचा निर्णय घेण्यात आला. चळे येथील महादेव मंदिरात याबाबत सकल मराठा समाजाची बैठक पार पडली. या वेळी सोलापूर राखीव मतदारसंघासाठी हरि शिखरे, हरि कांबळे, लखन वाघमारे यांनी मराठा समाजाच्या पाठींब्यासाठी इच्छुक म्हणून तयार असल्याचे सांगितले. तर माढा लोकसभा मतदारसंघासाठी प्रदीप मोरे, युवराज गायकवाड यांनी निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली. ही प्रातिनिधिक स्वरुपातील बैठक निवडणूक विषयी रुपरेषा, आचारसंहिता याबाबतीत विचार मंथन होवून संपन्न झाली. या पुढील निर्णय मनोज जरांगे पाटील व सकल मराठा समाजाच्या पुढील आदेशाप्रमाणे घेण्याचे ठरले. सध्यातरी निवडणूक लढवणे व माघार न घेणे या बाबतीत शिक्कामोर्तब करण्यात आला.

# शेळवे येथे सनराईज फेस्टिव्हल संपन्न

पंढरपूर –पंढरपूर तालुक्यातील शेळवे येथील उपक्रमशील प्रशाला सनराईज पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाचा पहिला दिवस व माता भगिनी सन्मान सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

सनराईज फेस्टिव्हलच्या पहिल्या दिवशी प्रशालेत शेळवे पंचक्रोशीतील कर्तृत्वान महिलांचा सन्मान विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या मातोश्री जयश्री पाटील यांच्या हस्ते तर अपेक्षा पाटील, मुख्याध्यापिका शांता वाघमोडे, कल्पना घाडगे, पोलीस अधिकारी सविता थोरात यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी शेळवे गावच्या सीमा सुरक्षाबलाच्या अधिकारी दीपाली गाजरे तसेच सुनिता गाजरे, देवडेच्या प्रमिला झांबरे, पट.कुरोलीच्या नंदा मोरे, आजोतीच्या आरती पवार, भंडीशेगावच्या यलमर, वाडीकुरोलीच्या लाडाबाई काळे व व्होळेच्या सुवर्णा भुसनर आदी महिला




सरपंचासह शेवतेच्या उपसरपंच वैशाली उलभगत यांचा सन्मान करण्यात आला.

अध्यक्षस्थानी शिवाजी शिंदे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उस्मानाबाद बँकेचे व्यवस्थापक माने, पाटबंधारे अधिकारी सोमनाथ देशमुख, सामाजिक कार्यकर्ते ॲड.विजयकुमार नागटिळक, विठ्ठल कारखान्याचे संचालक रमेश चिखलकर, उपक्रमशील शिक्षक दत्तात्रय फाळके, ग्रामपंचायत सदस्य संतोष शिंदे, दत्तात्रय खपाले, तानाजी सालविठ्ठल, गुरसाळेचे दीपक शिंदे, उपरीचे निवास नागणे, पिराची कुरोलीचे लामकाने आदी उपस्थित होते.

# उद्या जिल्ह्यात ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन

पंढरपूर – महावितरण तर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि.२० मार्च रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ.भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे मार्चमधील ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन २० मार्च रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व ग्रामीण येथील विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा.पर्यंत करण्यात आले आहे. तरी वरीलप्रमाणे कार्यकारी अभियंता, महावितरण यांचे कार्यालयात उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी.

सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील, सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मिळणे, मीटर रीडिंग वेळेत न घेणे, कनेक्शन वेळेत न मिळणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, नविन मीटर, डी. पी.बदलून न मिळणे अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे असे आवाहन ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, संघटक महेश भोसले, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सचिव प्रा.धनंजय पंधे, अण्णा ऐतवाडकर यांनी केले आहे.

# माढा मतदारसंघात भाजपा विरोधात तुल्यबळ उमेदवार नाही–खा.निंबाळकर

पंढरपूर – लोकसभा निवडणूकीचे बिगूल वाजले असून सर्वच पक्षांच्या गाठी भेटी व मतदारसंघातील नेते मंडळींची बैठका होत आहेत. या पार्श्वभूमीवर माढा लोकसभा मतदारसंघातील महायुतीची बैठक करमाळ्याचे आ. संजयमामा शिंदे यांच्या फार्म हाऊसवर पार पडली. यावेळी पत्रकार परीषदेमध्ये खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी माढा मतदारसंघात भाजपा विरोधात तुल्यबळ उमेदवार नाही असे प्रतिपादन केले. तसेच विजयसिंह मोहिते–पाटील यांच्या नाराजीवर वरीष्ठ पातळीवर मन धरणी सुरू असून चर्चेअंती प्रश्न मार्गी लागेल अशी शाश्वती दीली.

यावेळी आ. बबनराव शिंदे यांनी बोलताना म्हटले माढा मतदारसंघात महायुतीची वज्रमुठ कायम राहणार असून महायुतीतील सर्वच नेते एकजूटीने काम करणार आहेत. यावेळी माण खटाव चे आमदार जयकुमार गोरे यांनी गतवर्षीच्यापेक्षा अधिकचे मताधिक्क्य निंबाळकर यांना देण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले आहेत अशी ग्वाही दिली. माळशिरस



तालुक्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून विकासकाम च्या पाठबळावर जनता भरगोस मतदान महायुतीच्या उमेदवारला देणार असल्याचे आ. राम सातपुते यांनी सांगितले.

यावेळी बबनराव शिंदे, जयकुमार गोरे, संजयमामा शिंदे, शहाजी पाटील, आ. राम सातपुते माढा, करमाळा, माळशिरस, माण खटाव व सांगोला या पाच तालुक्यातील आमदारांची उपस्थिती होती. मात्र करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील यांची अनुपस्थिती होती. तसेच कल्याणराव काळे, रणजितसिंह शिंदे, दिपक साळुंके, दिग्विजय बागल, शंभूराजे जगताप, भारत शिंदे आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्तव्यावर असताना धुम्रपान केल्यास ५ हजारांचा दंड

## सीईओ मनीषा आव्हाळे यांचे आदेश

सोलापूर – कार्यालयात ड्युटीवर असताना तोंडात गुटका, सुपारीचा तोबरा भरणाऱ्या कर्मचाऱ्यास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी पाच हजाराचा दंड करण्याचे प्रशासनाला आदेश दिले आहेत.

महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कार्यक्रम सायंकाळी झाल्याने सन्मान झाल्यावर महिला कर्मचारी घाईघाईने बाहेर पडत होत्या. त्यावेळी आव्हाळे यांनी त्यांना थांबवले. मला तुमच्याशी काही बोलायचे आहे म्हणून इतर कर्मचाऱ्यांना त्यांनी सभागृहाबाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी महिला कर्मचाऱ्यांशी विश्वासाने संवाद साधला. यावेळी महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येणाऱ्या अडचणी सांगितल्या. त्यानंतर सीईओ आव्हाळे यांनी अचानकपणे दुपारी बांधकाम कार्यालयाला भेट दिली. कार्यालयातील स्वच्छता व कर्मचारी कसे बसतात याची पाहणी केली. यावेळी एका कर्मचाऱ्यांच्या तोंडात गुटक्याचा तोबरा दिसला. त्यांनी तात्काळ त्या कर्मचाऱ्यांची कान उघाडणी केली. कार्यालयीन कामकाजावेळेस अस्वच्छता करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यास पाच हजाराचा दंड करण्याचे प्रशासनाला आदेश दिले. त्यानंतर कार्यालयात असलेल्या पाण्याच्या बाटल्यांचीही त्यांनी तपासणी केली. कार्यालयात महिला सहकारी असतात, स्वच्छता राखा, जेवणाच्यावेळी घाणीचे प्रदर्शन होईल, असे कोणतेही कृत्य करू नका अशी ताकीद त्यांनी दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांच्या या आदेशानंतर जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी धास्ती घेतली आहे. आव्हाळे यांनी पदभार घेतल्यापासून जिल्हा परिषद परिसर व कार्यालयातील स्वच्छतेकडे काटेकोरपणे लक्ष दिले आहे. दररोज सफाई कर्मचाऱ्यांकडून परिसराची साफसफाई



केली जाते. त्यामुळे कार्यालयीन परिसरात पान, तंबाखू, गुटखा खाऊन थुंकणाऱ्यावर जरब बसली पाहिजे, अशी ॲक्शन घेण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. कार्यालयीन परिसरात सीसी टीव्ही कॅमेऱ्याची नजर आहे. यामुळे प्रशासन जि. प. कर्मचाऱ्यांबरोबर कामानिमित्त येणाऱ्या गुटखा खाऊ नागरिकांनाही दंड करू शकते.

# उजनीच्या कॅनॉलचा मोबदला मिळावा,अन्यथा २६ मार्चला पुणे आयुक्तांलयासमोर धरणे आदोलन.

## शरद जोशी शेतकरी संघटनेचा इशारा

**पंढरपूर –** पंढरपूर तालुक्यातील उजनी कॅनलचा भूसंपादन मोबदला शेतकऱ्यांना मिळावा या मागणीचे निवेदन शरद जोशी शेतकरी संघटनेच्यावतीने पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांना दिले आहे. आयुक्तांनीही या निवेदनावर रिमार्क स्वाक्षरी करून सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दूरध्वनीवरून तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र या मागणीची दखल न घेतल्यास २६ मार्चला पुणे आयुक्तांलयासमोर धरणे आदोलन केले जाईल असा इशाराही शेतकरी संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

या दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळ गावे जाहीर केलेल्या गावात सन –२०१७ च्या शासन निर्णयानुसार उपाय योजना तात्काळ करावेत,तसेच पंढरपूर तालुक्यातील उजनी डावा कालवा वितरिकामधील काही गावातील गटांचे संपादन प्रक्रिया झालेली आहे व काहीची झालेली नाही,तसेच लघु वितरिकामधील बाधित शेतकऱ्याचे गेल्या ४० वर्षापासून भूसंपादन प्रक्रिया झाली नसल्यामुळे त्या संपादित जमिनीचा मोबदला मिळावा अशी मागणी ही यावेळी



करण्यात आली. पंढरपूर तालुक्यातील मौजे शिरढोण,भंडीशेगाव, कवठाळी, शेडगेवाडी, केसकरवाडी,वाडीकुरोली, धोंडेवाडी,तावशी,बाभूळगाव, सुपली या गावातील निवाडा (अवार्ड) निधीअभावी व्यपगत झाला असल्याने भूसंपादन झालेल्या मोबदल्यासाठी प्रस्ताव सादर करा म्हणून आदेश करून देखील अद्यापपर्यंत मोबदला मिळाला नाही त्यामुळे यांना ताबडतोब मोबदला मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनात केलेल्या मागण्याचा विचार व्हावा अन्यथा सोलापूर जिल्हा शरद जोशी शेतकरी संघटनेच्या वतीने मंगळवार दि.२६ मार्च रोजी पुणे आयुक्तांलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असून होणाऱ्या परिणामास सबंधित अधिकारी व प्रशासन जबाबदार राहील असा इशाराही त्यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे.यावेळी शेतकरी संघटनेचे श्रीकांत नलवडे, महेश बिस्किटे, नितीन जरग, धोंडिराम मदने,अभिषेक कालेकर आदि उपस्थित होते.

# सोलापूरला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीची पाच ठिकाणी गळती

## सोलापूरचा पाणीपुरवठा पाच दिवसाआड

**सोलापूर –** एकीकडे उजनी धरणातील पाणीसाठा कमालीचा खालावत असताना याच धरणातून सोलापूरसाठी पिण्याचा पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला पाच ठिकाणी गळती सुरू झाली आहे. ही गळती रोखण्यासाठी महापालिका प्रशासनाने शहराचा पाणीपुरवठा चार दिवसाआड ऐवजी पाच दिवसाआड करण्याचा निर्णय घेतला आहे.

मागील पावसाळ्यात पुरेशा पावसाअभावी गेल्या ऑक्टोबरपर्यंत उजनी धरण ६०.६६ टक्क्यांपर्यंत भरले होते. परंतु धरणातील पाणी वाटपाच्या नियोजनाचे तीनतेरा वाजल्यामुळे सध्या धरणातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात खालावला आहे. धरणातील पाणीसाठा उणे पातळीवर १८.६५ टक्क्यांपर्यंत खालावला असतानाच सोलापूरसहपंढरपूरव सांगोला आदी शहरांसाठी गेल्या ११ मार्चपासून धरणातून सहा टीएमसी पाणी भीमा नदीवाटे सोडले जात आहे. गेल्या पाच दिवसांत धरणातील तीन टीएमसी पाणी संपले असून आणखी तीन



दिवस म्हणजे १९ मार्चपर्यंत पाणी सोडले जाणार आहे.

सध्या धरणातील पाणीसाठा उणे २४.२६ टक्के इतका खालावला आहे. उणे पातळीतील १३ टीएमसी वापरण्यात आले आहे. सध्या धरणात ५०.६६ टीएमसी पाणीसाठा असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात धरणात खाली साचलेला गाळ, वाळूचे प्रमाण किती, हा संशोधनाचा विषय ठरल्यामुळे प्रत्यक्ष शिल्लक पाणीसाठा किती, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.